**विषय-** **सार्वजनिक बांधकाम विभाग**
**कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदावर सरळ सेवेने नियुक्ती बाबत**

**संदर्भ-** शासन, सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ निर्णय क्र. भरती-२०१८/प्र.क्र.३४६/ सेवा-३, दिनांक १६.८.२०१९

**कार्यालयीन आदेश क्रमांक १९० / सन २०१९**

शासन सा.बां.विभाग, मंत्रालय मुंबई यांचे संदर्भिय आदेशानुसार खालील नमूद केलेले कनिष्ठ अभियंता हे नियुक्तीस पात्र ठरल्यामुळे त्यांची सविस्तर नेमणूक ही सार्वजनिक बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदावर ते रुजू होतील त्या दिनांका पासुन वेतन स्तर एस-१४ रु.३८६००-१२२८०० या वेतनश्रेणीत रकाना क्र.३ मध्ये या प्रादेशिक विभागांतर्गत तात्पुरती नियुक्ती करण्यात येत आहे.

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदावर उमेदवाराची करण्यात आलेली नियुक्ती ही या विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदाच्या सेवाभरती नियमातील तरतूदीनुसार भरतीसाठी उपलब्ध असलेल्या रिक्त पदावर शासन आदेशातील परिच्छेद क्र.४ मधील विहीत अटींच्या अधिन राहून करण्यात येत आहे. सोबत संदर्भिय शासन निर्णयाची प्रत जोडण्यात येत आहे. त्यानुसार मंडळ स्तरावरुन निर्णयाच्या अनुषंगाने अटी, शर्ती विशद करुन सविस्तर आदेश स्वतंत्ररित्या निर्गमीत करावेत.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | सविस्तर नियुक्तीसाठी देण्यात आलेले ठिकाण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | श्रीमती प्रियांका राजेंद्र पाटील | सा.बां.विभाग, नंदूरबार अंतर्गत सा.बां.उपविभाग क्र.१ नंदूरबार येथे रिक्त पदी |
| २ | श्रीमती पूजा हेमंत पितृभक्त | जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर अंतर्गत जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.१, अहमदनगर येथे रिक्त पदी |
| ३ | श्रीमती माधुरी गजानन लांबे | सा.बां.विभाग क्र.२ जळगाव अंतर्गत सा.बां.विभाग क्र.२, जळगाव (प्रकल्प शाखा) येथे रिक्त पदी |
| ४ | श्रीमती हर्षाली राजू गायकवाड | सा.बां.विभाग, नंदूरबार अंतर्गत सा.बां.उपविभाग क्र.२ नंदूरबार येथे रिक्त पदी |
| ५ | श्रीमती रासेश्वरी जनार्दन जाधव | जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर अंतर्गत जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.२, अहमदनगर येथे रिक्त पदी |

स्थळ प्रतीवर मु.अ. यांची सही असे

**जा.क्र.का-४/सेवा-२/ ४४४७/२०१९**
**कार्यालय- मुख्य अभियंता,**
**सा.बां.प्रादेशिक विभाग, नाशिक.**
**दिनांक - २१ / ८ /२०१९**

**( पी.बी.टोपले )**
**विशेष अधीक्षक (प्रभारी)**
**मुख्य अभियंता करिता**

प्रत- कार्यासन अधिकारी, सेवा-३ सा.बां.विभाग,मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.

[illegible] 16819.docx

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

**महाराष्ट्र शासन**
**अधीक्षक अभियंता,यांचे कार्यालय सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**बांधकाम भवन अहमदनगर ४१४००१**

| दुरध्वनी कार्यालय :- (०२४१) २४२२६९५/३९ | फॅकस :- (०२४१) २४२२९९५/३९ |
|---|---|
| ई-मेल :- ahmednagar.se@mahapwd.com | वेबसाईट :- www.mahapwd.com |

**कार्यालयीन आदेश क्र. ३७० /सन २०१९**

विषय :- **सार्वजनिक बांधकाम विभाग**
**कनिष्ठ अभियंता-(स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदावर सरळ सेवेने नियुक्ती बाबत....**
श्रीमती रासेश्वरी जर्नादन जाधव

**संदर्भ :-** १. शासन सा.बां.विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ निर्णय क्र.भरती-२०१८/प्र.क्र.३४६/सेवा-३,दिनांक १६.८.२०१९
२.मुख्य अभियंता,सा.बां.प्रादेशिक विभाग,नाशिक यांचे का.अ.क्र.१९०/२०१९ ,जा.क्र.का-४/सेवा-२/४४४७/२०१९ दि.२१.८.२०१९

संदर्भाधिन आदेशान्वये, श्रीमती रासेश्वरी जर्नादन जाधव यांची सरळ सेवेअंतर्गत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदावर सरळ सेवेने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

उपरोक्त आदेशात नमुद केल्याप्रमाणे सविस्तर पदनियुक्ती या आदेशान्वये खालीलप्रमाणे करण्यांत आलेले आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नांव | पदनाम | सविस्तर पदनियुक्ती करण्यात आलेल्या कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती रासेश्वरी जर्नादन जाधव | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) | **कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर अंतर्गत जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.२, अहमदनगर** |

**अटी व शर्ती**

१. वरील उमेदवाराची सार्वजनिक बांधकम विभागात कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदावर रुजु होतील त्या दिनांकापासुन वेतन स्तर एस-१४ रु.३८६००-१२२८०० या वेतनश्रेणीत त्यांच्या नावासमोर दर्शविल्या नुसार अहमदनगर जिल्हयात तात्पुरती नियुक्ती करण्यांत येत आहे.

२. महाराष्ट्र शासकीय गट -अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) या पदावर सरळ सेवेन नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग सरंरचना व विभागीय संवर्ग वाटप नियमावली क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या-१२दि.२८/४/२०१५ ,दि.१६/७/२०१५ का.मा.दि.१५/६/२०१७ व दि.१२/४/२०१८ लागु राहतील. सदर उमेदवाराची सार्वजनिक बांधकाम विभागातील पदस्थापना ही अंतीम असुन त्यात बदल होणार नाही.

३. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदावर उमेदवारांची करण्यांत आलेली नियुक्ती ही या विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या पदाच्या सेवाभरती नियमातील तरतुदी नुसार भरतीसाठी उपलब्ध असलेल्या रिक्त पदावर खालील विहित अटी शर्तीच्या अधीन राहुन करण्यांत येत आहे.

   १. महाराष्ट्र शासनाच्या सेवेत सविस्तर पदनियुक्ती झाल्यापासुन १ महिण्याच्या आत सेवेत रुजु व्हावे अन्यथा एक महिन्यानंतर सदर नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील याची कृपया नोंद घ्यावी.

   २. एखादया उमेदवारास विहीत कालावधीत अपरिहार्य,उचित कारणास्तव रुजु होण्यासाठी मुदतवाढ हवी असल्यास त्या उमेदवारांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन दहा दिवसाच्या आत अप्पर मुख्य सचिव सा.बां.विभाग,मंत्रालय,मुंबई यांना विहीत मार्गाने मुदतवाढीसाठी अर्ज करावा. तदनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. उचित कारणास्तव विहीत कालावधीत मुदतवाढीसाठी अर्ज करणा-या उमेदवारांना मुदतवाढ देण्याचा/नाकारण्याचा अंतिम निर्णय शासनाचा राहील.

   ३. जे उमेदवार शासन निर्णयाच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत हजर होणार नाहीत अथवा त्यांचेकडुन यासंबधात काहि सुचना प्राप्त झाली नाही तर ही नियुक्ती त्यांना स्विकृत नाही असे समजुन उमेदवाराच्या नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील . या बाबतचा अहवाल संबधित कार्यकारी अभियंता यांनी शासनाला दिनांक २१/९/२०१९ पर्यंत सादर करावा.

Dr. V.V. PATIL COLLEGE OF ENGINEERING Ahmednagar

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

४. सदर उमेदवारांना सार्वजनिक बांधकाम विभागात रुजू करुन घेण्यापुर्वी जाहिरातील नमुद केल्यानुसार वयोमर्यादेची तसेच शैक्षणिक व अन्य अटींची पुर्तता करणारी मुळ कागदपत्रे (वय, अधिवास, शैक्षणिक पात्रता, महिला आरक्षणानुसार विहित केलेले प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अनाथ प्रमाणपत्र इ.) तपासून रुजू करून घ्यावे.

५. उमेदवाराची जेष्ठता शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्हि१०७६/१२, दिनांक २१/०६/१९८२ अन्वये विनियमित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियम, १९८२ मधील तरतुदीनुसार गुणवत्ता क्रमांकानुसार निश्चित करण्यात येईल. त्यामुळे नियुक्तीच्या आदेशानुसार एक महिन्याच्या आत सेवेत रूजू न होणाऱ्या उमेदवारांना सेवा ज्येष्ठता गमवावी लागेल व त्यांची ज्येष्ठता ते ज्या दिनांकास शासन सेवेत रूजू होतील, त्या दिनांकास निश्चित करण्यात येईल.

६. मागास प्रवर्गाच्या राखीव पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांची प्रचलित नियमातील तरतुदीनुसार जात वैधता प्रमाणपत्राच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात येत आहे. मागासवर्गीय उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र शासनास व संबधित उमेदवारांची नियुक्ती करण्यात आलेल्या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. त्यानुसार संबधित उमेदवारांच्या मुळ सेवापुस्तकात नोंद घेण्याची कार्यवाही संबधित कार्यालय प्रमुखांनी करावी.

मागास प्रवर्गाच्या राखीव पदावर (अ.जा., अ.ज., वि.जा.,भ.ज.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. तसेच एस.ई.बी.सी.) नियुक्ती करण्यात आलेल्या मागासवर्गीय उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास, त्यांनी या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक राहील. विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबधित उमेदवाराची सेवा प्रचलित नियमानुसार समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

७. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दिनांक २५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार, खुला ( महिला ) आणि मागास प्रवर्गातील महिलांसाठीच्या राखीव पदाकरीता निवड झालेल्या महिलासाठीचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत तपासणीसाठी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने महिला उमेदवाराने १ महिन्याच्या आत नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र दोन प्रतीत विहित मार्गाने शासनास सादर करावे. मा. आयुक्त महिला व बाल विकास, पुणे यांच्याकडून नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र पडताळणीच्या अहवालानुसार महिला उमेदवार अपात्र ठरत असल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

८. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय दि. ०१/०७/२०१६ मधील तरतुदीनुसार खेळाडू प्रवर्गातुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येत आहे. सदर तरतुदीची पुर्तता होत नसल्यास संबधित उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

९. उमेदवारांनी हिंदी व मराठी भाषा परिक्षा अगोदरच उतीर्ण केली नसेल किंवा सदर भाषा परीक्षा उतीर्ण न झाल्यास त्यांची वेतनवाढ प्रचलित नियमाप्रमाणे रोखून ठेवण्यात येईल.

१०. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. प्रशिक्षण२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.०७/०८/२००१ अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरीता संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसारा सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९/०३/२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून २ (दोन) वर्षाच्या आत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहिती मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांची सदर पदावरील सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

११. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : अनियो-१००६/८७/सेवा-४, दि. १२/०१/२००७ मधील (I) ते (IV) येथे नमुद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबधित शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन ) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होईल. वित्त विभागाच्या उपरोक्त दिनांक १२/०१/२००७ च्या परिपत्रकात नमुद (I) ते (IV) येथील सर्व अटींची पुर्तता ज्या प्रकरणी होत नसेल अशा शासकीय कर्मचाऱ्यास नविन परिभाषित अंशदान निवृत्तीयोजना लागू होईल.

१२. उमेदवारांनी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) गट-ब (अराजपत्रित) या पदासाठी विहित केलेली व्यावसायिक परीक्षा विहित कालावधीत उतीर्ण होणे आवश्यक आहे.

१३. उमेदवारांनी वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात यावे.

१४. सदर नियुक्ती उमेदवारांनी सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या सत्यासत्यतेवर अवलंबून राहील उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे तसेच साक्षांकन नमुन्यात नमुद केलेली माहिती नियुक्ती नंतर खोटी अथवा बनावट आढळल्यास सदरहू उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल

१५. उमेदवारांच्या सेवानिवृत्तीचे वय प्रचलित नियमानुसार राहील.

१६. आवश्यकता भासल्यास नियुक्त उमेदवारांना भारताच्या संरक्षण सेवेतील पदावर किंवा भारताच्या संरक्षणाशी निगडीत असलेल्या कुठल्याही पदावर देशात किंवा परदेशात प्रशिक्षणाचा कालावधी धरुन चार वर्षापेक्षा कमी नसणा-या कालावधीसाठी भारत सरकार ठरवेल त्या शर्तीवर सेवा करावी लागेल. परंतु ,

अ) त्यांच्या नियुक्तीनंतर १० वर्षाचा कालावधी संपल्यानंतर त्यांना अशी सेवा करावी लागणार नाही

किंवा

ब) सर्वसाधारणपणे त्यांच्या वयाची ४० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांना अशी सेवा करावी लागणार नाही.

Dr. V.V. PATIL COLLEGE OF ENGINEERING Ahmednagar

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

१७. उमेदवार सेवेत रुजु झाल्यानंतर सेवेचा राजीनामा देऊ इच्छित असल्यास, त्याला शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक एसआरव्ही १०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दिनांक ०२/१२/१९९७ मधील तरतुदीनुसार शासनाला किमान (एक) महिन्याची आगाऊ नोटीस किंवा एक महिन्याचे मुळ वेतन देणे आवश्यक राहील. मात्र, गैरशिस्त,सेवानियमांचा भंग इत्यादी कारणासाठी एखादया उमेदवाराची सेवा समाप्त करण्यासाठी वरीलप्रमाणे नोटीस देण्याचे बंधन शासनावर असणार नाही.

१८. उमेदवारांना महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणासंबंधी, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१३-अ दिनांक २३/०९/२०११ मधील परिच्छेद सहा येथील तरतुदीनुसार दिर्घ कालावधीचे व विदेशी प्रशिक्षणापुर्वी प्रशिक्षणार्थीला सक्षम प्राधिका-याबरोबर बंधपत्र लिहुन दयावे लागेल व त्याप्रमाणे नंतर प्रशिक्षणावरील खर्च झालेली रक्कम सदर प्रशिक्षणार्थीकडुन वसुल करुन संबंधीत प्राधिका-याला शासनाकडे जमा करावी लागेल. याबाबतचे दर शासन निश्चित करेल. त्यानुसार प्रत्येक प्रशिक्षणार्थीला महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी (मेटा), नाशिक यांच्याकडे व संबंधीत नियुक्ती प्राधिका-याकडे विहित बंधपत्र भरुन सादर करणे बंधनकारक राहील.
उपरोक्त वसुली केल्याशिवाय प्रशिक्षणार्थीचा राजीनामा क्षेत्रिय स्तरावरुन स्विकारण्यांत येऊ नये. त्यानुसार प्रत्येक प्रशिक्षणार्थीला महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी (मेटा) नाशिक येथे रुजु होण्यापुर्वी मुख्य अभियंता महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रबोधिनी नाशिक यांच्याकडे व संबंधीत नियुक्ती प्राधिका-याकडे विहित बंधपत्र भरुन सादर करणे आवश्यक राहील.

१९. प्रशिक्षणा दरम्यान सर्व प्रशिक्षणार्थी कडुन प्रबोधिनीच्या प्रशिक्षणा बाबताच्या नियमांचे व शिस्तीचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे. त्यांच्याकडुन नियमभंग झाल्यास प्रबोधिनीकडुन त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यांत येईल.

२०. उमेदवारांना वैदयकिय तपासणी अहवाल शासनास सादर करण्याच्या अटींच्य अधीन राहुन तात्पुरते नियुक्त करण्यांत येत आहे.संबंधीत कार्यकारी अभियंता,यांनी उमेदवारांच्या वैदयकिय तपासणी अहवालाची नोंद त्यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेऊन त्याची एक प्रत शासनांस या आदेशाच्या दिनांकापासुन एक महिन्याच्या आत सादर करावी.

२१.शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक चारित्र्य -२११७/प्र.क्र.४८३/१६-अ,दिनांक २८/०८/२०१७ अन्वये संबंधित कार्यकारी अभियंता यांनी उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद त्यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेऊन त्याची एक प्रत शासनास या आदेशाच्या दिनांकापासुन एक महिन्याच्या आंत सादर करावी. उमेदवारांनी साक्षांकन नमुन्यात सादर केलेली माहिती असत्य असल्याचे आढळुन आल्यास तात्पुरते नियुक्ती आदेश रददबादल करुन भारतीय दंडसंहितेनुसार फौजदारी कारवाई करुन सदर उमेदवारांना शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यांत येईल.

२२. सदर नियुक्ती आदेश, मा.सर्वोच्च न्यायलय, नवी दिल्ली येथे दाखल करण्यांत आलेल्या SPL (C)No.०१५७०१/२०१९ व अन्य- श्री.संजीत शुक्ला व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर यावर देण्यांत येणा-या अंतिम निकालाच्या अधिन राहुन,निर्गमित करण्यांत येत आहे.

१. उमेदवार ज्या दिवशी रुजु होतील त्या दिवसापासुन नियमाप्रमाणे त्यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यांत यावेत व बदली झाल्यास ते संबंधीत अधिका-याकडे पाठवुन विभाग प्रमुखांनी याबाबत संबंधित मुख्य अभियंता/अधिक्षक अभियंता व शासनांस कळावे.

२. उमेदवार जलसंपदा विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा शासनाच्या इतर विभागात कार्यरत असल्यास, अशा उमेदवारांनी संबंधित विभागाच्या नियंत्रक अधिका-यांनी त्यांना नेमणुकीच्या ठिकाणी रुजु होण्याकरिता कार्यमुक्त केलेल्या आदेशाची प्रत सादर केल्यानंतर संबंधित कार्यकारी अभियंता यांनी रुजु करुन घ्यावी.

३. उमेदवारांनी विशिष्ट ठिकाणी पदस्थापना/नियुक्ती मिळण्यासाठी खासदार/आमदार/लोक प्रतिनिधी/खाजगी व्यक्ती किंवा संघटना यांचेमार्फत दडपण/दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास,संबंधीत उमेदवाराविरुध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम क्र.१९७९ मधील तरतुदी नुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यांत येईल.

वरिल संदर्भिय आदेशाच्या अटी व शर्ती जसेच्या तसे उमेदवारास लागू राहतील.

जा.क्र.आस्था-१/नियुक्ती/३४२७/सन २०१९
अधीक्षक अभियंता,सा.बां.मंडळ, अहमदनगर
दिनांक २२/८/२०१९

(गो.शि.[illegible])
**अधीक्षक अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ**
**अहमदनगर.**

प्रत-: मा. मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, नाशिक यांना संदर्भाधिन आदेशाचे अनुषंगाने माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रत-: कार्यकारी अभियंता,जागतिक बँक प्रकल्प विभाग,अ.नगर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत-: उपअभियंता,जा.बँ.प्र. उपविभाग,क्र.२, अहमदनगर यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत-: श्रीमती रासेश्वरी जर्नादन जाधव, यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत-: कार्यालयीन आदेश नस्ती सन २०१९.

Dr. V.V.PATIL COLLEGE OF ENGINEERING Ahmednagar

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikh[illegible]
College of Engin[illegible]
Ahmednagar